महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१
आदेश क्र.प्राधि/ बदली/२०१९/१२८४/प्र.७-८
दिनांक :- 31 MAY 2019

ICT Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: ९००४
Date: ०३/०६/२०१९

**संदर्भ -** प्राधिकरण दि. २४.०५.२०१९ रोजीचे बदल्याबाबतचे आदेश.

आ दे श -

प्रशासकीय हित लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-क संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांच्या नियतकालिक बदल्या करण्यांत आलेल्या आहेत. सदर बदली आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सूचनांचे पालन करावे.

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी पर्यायी अधिकारी/कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेले अधिकारी/कर्मचारी यांना ३१ मे २०१९ (म.नं.) यापुर्वी कार्यमुक्त करावे.

२. बदली झालेले अधिकारी/कर्मचारी त्यांचे संबंधित विभाग/कार्यालयातून कार्यमुक्त होऊन रूजू होणेसाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रूजू करून घ्यावे. एखाद्या अधिकारा /कर्मचा-यास रूजू करून न घेतल्यामुळे प्रतीक्षाधीन काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याबाबत प्रसंग उद्‌भवल्यास संबंधित विभाग / कार्यालय प्रमुखांस जबाबदार धरण्यात येईल.

३. बदलीच्या आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

४. ज्या अधिकारी/अभियंता/कर्मचारी यांची बदली मंडळांतर्गत करण्यात आली आहे. त्यांना १ जुन २०१९ पुर्वी बदली करण्यात आलेल्या पदाचा कार्यभार स्विकारावयाचा आहे. अशा प्रकारे बदली झालेल्या अधिकारी/अभियंता/कर्मचारी यांच्या पदस्थापनेत प्राधिकरणाच्या मंजूरीशिवाय मंडळस्तरावर बदल करण्यात येऊ नये. तसे आढळून आल्यास कार्यालय प्रमुख व विभागप्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.

५. सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याने बदली झालेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे दि. ३१ मे २०१९ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या विभागाने काढावे. दि.१ जून २०१९ पासूनचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या विभागाकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित अधिकारी /कर्मचारी बदलीच्या विभागात हजर झाल्यानंतर बदलीनंतरच्या विभागाने काढावे व तसा अहवाल प्राधिकरणाचे प्रशासन विभागास सादर करावा. दि. १ जून २०१९ पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या विभागातील लेखा अधिका-यांने अदा केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल, अशा सूचना सर्व लेखा व प्रशासकीय विभागांना देण्यात येत आहेत.

बदली झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यमुक्त केल्याबाबत व रूजू करून घेतल्याबाबतचा अनुपालन अहवाल दि. ५ जून २०१९ पूर्वी प्राधिकरणास सादर करावा.

**मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे मान्यतेने.**

(प्रसाद उर्कुडे)
सचिव /प्राधिकरण.

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा.
२.मुख्य अभियंता / प्रा. (१/२/३)
३.मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि. व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.व पु.मं.
४.वित्त नियंत्रक / प्रा.
५.विधी सल्लागार / प्रा.
६.उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८.मुख्य अधिकारी, कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
९. सहमुख्य अधिकारी /मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
१०.चौकशी अधिकारी / प्रा.
११.सक्षम प्राधिकारी - १,२ /प्रा
१२.उपमुख्य अभियंता, मा.व.सं.तं.कक्ष / प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)
१३.मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं.
१४.लेखाधिकारी/प्रा./कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती मंडळ
१५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.
१६.संचालक, पी.डी.सी. पुणे

प्रत- प्रशासकीय अधिकारी/ प्रा./मुं.मं./ मुं.इ.दु.व पु.मं./कोंकण/मुं.झो.सु.मं./पुणे/नाशिक/ औरंगाबाद /नागपूर/ अमरावती मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई.
प्रत :- प्रशासन-५/६/७/९/१०/१२/१३/१४/१५/१६/१७/प्रा.

---***---